# ग्रीक नगरराज्यातील तत्वांचे विश्लेषण

**प्रा. डॉ. चंद्रशेखर शंकरराव ढोले**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
शिवजागृती महाविद्यालय, नळेगाव

**प्रस्तावना :-**

प्राचीन ग्रीक नगरराज्यात दोन नगरराज्य होती. ती म्हणजे स्मार्ट व ॲथेन्स या दोन्ही नगरराज्यात राजकीय विचार नियम होते. त्यात समाजातील वर्ग नागरिकत्वाचे नियम न्यायदानाची पध्दत व लोकांचा कायद्याविषयी आहार व सन्मान गुलामगिरी स्त्रीयांना नागरिकत्व का नाकारले. अशा अनेक बाबी प्राचीन ग्रीक नगरराज्यात होत्या. याच नियमाच्या अनुषंगाने प्रस्तुत शोधनिबंध ग्रीक नगरराज्यातील तत्वाचे विश्लेषण करण्यात आले आहे.

**१) भुप्रदेश व लोकसंख्या :-**

ही नगरराज्ये सध्याच्या राज्यांच्या मानाने अगदी लहान होती. भूप्रदेश आणि लोकसंख्या या बाबतीत सध्याच्या एखाद्या मोठ्या शहराशी त्यांची तुलना होऊ शकेल. प्रत्येक नगरराज्यात किती लोकसंख्या होती है निश्चित सांगणे पुराव्याच्या अभावी अशक्य आहे पण अथेन्सची लोकसंख्या सुवर्णयुगाच्या काळात तीन लक्षांच्या जवळ पास होती.

२) **समाजातील तीन वर्ग :-**

लोकसंख्या छोटी असूनही त्या काळात समता नव्हती. राजकीय आणि कायदेशीर दृष्ट्या समाजात तीन वर्ग होते. गुलाम, परदेशी नागरिक, नागरिक है ते तीन वर्ग. गुलामगिरीला सर्वांची मान्यता पाहायला मिळते. नगरराज्याचे अर्थकारण गुलामगिरीवर आधारलेली होती. अथेन्सच्या एकूण लोकसंख्येपैकी एक तृतीयांश गुलामाचा वर्ग होता. क्वचित् एखाद्याला गुलामांच्या हीन परिस्थितीबद्दल कळवळा वाटत असे. बहुसंख्य लोक गुलामगिरी नैसर्गिक मानीत होते. गुलामांच्या अस्तित्वाबद्दल त्या प्रथेच्या चांगले आणि बाईटाबद्दल चर्चा होत नसे. नागरिकांना कष्ट करण्यात कमीपणा वाटत असे. ॲरिस्टॉटलने गुलामगिरीचे समर्थनच केले आहे. नागरिकांना राजकारणासाठी अधिक मोकळा वेळ मिळावा म्हणून सर्व श्रमाची कामे मजुरांकडून करून घ्यावीत असे ॲरिस्टॉटल सांगतो.

गुलामांची संख्या इतकी जास्त असल्यामुळे नागरिकांना भरपूर रिकामा वेळ मिळत असावा व त्यामुळे राजकीय विचार ग्रीक नगरराज्यात वाढला असावा असे वाटते. सबाइनला मात्र हे मत पसंत नाही. नगरराज्याची आर्थिक स्थिती चांगली नव्हती. त्यामुळे नागरिकांनाही श्रम करावे लागत असावेत असा सवाइनचा अंदाज आहे.

अथेन्ससारख्या व्यापारी केंद्रात बरेचसे विदेशी नागरिक राहत असत. ते स्वतंत्र असत पण त्यांना नागरिकत्वाचे हक्क मिळत नसत. कारभारात त्यांना भाग घेता येत नसे. असे परदेशी नागरिक अनेक वर्षे राहत; पण सध्याच्या प्रमाणे नागरिकत्व बदलता येत नसे.

तिसरा वर्ग म्हणजे स्वतंत्र नागरिक हे नगरराज्याचे सभासद समजले जात. नगरराज्याच्या राजकीय घडामोडीत सक्रिय सहभागी होण्याचा त्यांना हक्क होता. हा हक जन्मसिद्ध होता. कारण नागरिकत्व आई-वडिलांच्या नागरिकत्वानुसार मिळे. नागरिकांचे राजकीय कार्यात सहभागी होणे महत्त्वाचे होते. ज्या प्रमाणात नगरराज्यात लोकशाही असेल त्या प्रमाणात हा सहभाग कमीजास्त होई. नागरिकांच्या लोकसभांना उपस्थित राहणे, अधिकार-पदांवर नियुक्त होणे, ज्यूरी म्हणून न्यायदानात भाग घेणे वगैरे गोष्टी नागरिकांच्या सहभागात समाविष्ट होत.

नागरिकत्व म्हणजे एखाद्या वस्तूची मालकी नसून कुटुंबातील संबंधाप्रमाणे सर्वा बरोबर वाटून घेण्याची वस्तू आहे अशी ग्रीकांची कल्पना होती. ग्रीक विचारवंतामध्ये नागरिकत्वासंबंधीच्या वरील कल्पनेने एक वैशिष्टय निर्माण केले आहे. प्रत्येक व्यक्तीला समाजात, राज्यात कोणते स्थान द्यावे म्हणजे सहभाग वाढेल असा विचार मनाशी धरून सिद्धान्त मांडले जातात. व्यक्तीला हक्क देणे हे गौण, तिचा

सक्रिय सहभाग सरकारी कामात वाढविणे हे ग्रीक तत्त्वज्ञांनी महत्त्वाचे मानले.

**३) नागरिकत्व**

विसाव्या वर्षी नागरिकत्व प्राप्त होई. वर्षातून दहा वेळा (अथेन्समध्ये) सर्व नागरिकांची लोकसभा भरविली जात असे. त्यात नगरराज्याच्या सर्व धोरण कारभारविषयक प्रश्नांवर चर्चा होत असे. कौन्सिलला वाटल्यास खास बैठकाही बोलावल्या जात.

**४) अधिकार पदे**

अधिकारपदे निवडणुकीने व चिठ्ठया टाकून मिळत. सर्वांना संधी मिळाली पाहिजे ही चिडया टाकण्यामागील भावना होती. या लोकांना मुदत अल्प असे आणि त्यांना मध्येच काढून टाकण्याचाही अधिकार असे.

नगरराज्ये आकाराने लहान असूनही त्याचे लहानलहान विभाग करून प्रत्येकातून प्रतिनिधी घेतले जात व त्यांच्या नावाच्या चिठ्ठया टाकून अधिकारपदे दिली जात.

राज्यकारभाराची मुख्य जबाबदारी दहा सेनापतींकडे असे. त्यांची लोकांकडून प्रत्यक्ष निवड होत असे. येथे चिठ्ठया टाकण्याचा प्रकार नव्हता. एकच व्यक्ती वर्षानु वर्षे निवडून येऊ शकत असे. या दहा सेनापतींचे असेंब्ली व कौन्सिलवर वजन असे. यांना सेनापती म्हणत; पण वस्तुतः त्यांचा दर्जा मंत्र्यांप्रमाणे असे. ही मंडळी बहुधा तडफदार वक्ते असत, कारण त्यांना लोकसभेत आपली बाजू मांडून मंजूर करून घ्यावी लागत असे.

लोकसभेत सर्व नागरिक सभासद असत व ते कौन्सिलचे ५०० सदस्य निवडीत. स्पार्टामध्येही कौन्सिल असे, पण तेथे नगरराज्यातील वयोवृद्ध अनुभवी नेते तहह्यात मुदतीने असत. ते लोकसमेला जबाबदार नसत.

५०० सदस्यांच्या कौन्सिलवर दैनंदिन राज्यकारभाराची जबाबदारी असे. इथेही सर्वजण नेहमी काम करीत नसत, आळीपाळीने सर्वांना चान्स मिळे. कौन्सिलला सरकारी प्रशासन व न्यायदानाचे विस्तीर्ण अधिकार असत. हे सर्व अधिकार वापरताना लोकसभेची पूर्वअनुमती लागत असे.

**5 ) न्यायदानपध्दती :-**

न्यायालयात काम करण्यासाठी सहा हजार लोकांची निवडणुकीच्या पद्धतीने एक यादी बनवीत व नंतर त्यांपैकी प्रत्येकाला आळीपाळीने न्यायाधीशाचे काम करने याची संधी मिळे. मात्र या यादीवर येण्यासाठी तीस वय पाहिजे. न्यायालयीन कामात प्रत्येक प्रकरणाच्या वेळी कमीत कमी २५० व जास्तीतजास्त ५०० न्यायाधीश माग पेठ कोर्टासमोरील बादी-प्रतिवादी आपापली बाजू स्वतः मांडीत व विरुद्ध पक्षावर आरोप सिद्ध झाल्यास काय शिक्षा द्यावी त्यासाठी सूचना मांडीत यादी प्रतिवादीपैकी कोण दोषी यावर न्यायाधीश मतदान करीत. नंतर शिक्षेच्या सूचनेवरही मतदान होत असे. या न्यायालयावर अपाची सोय नव्हती. न्यायाधीश निर्णय देत ते जनतेच्या नावाने देत, नागरिक विरुद्ध अधिकारी अशी प्रकरणे याच पद्धतीने निकालात निघत. समान प्रभावर समान न्याय अशी न्यायालयावर सक्ती नव्हती.

अमुक एका पदाला विशिष्ट व्यक्ती लायक नाही किंवा मुदत संपल्यानंतर या व्यक्तीने अधिकारसद नीट सांभाळले की नाही, त्याने सरकारी पैशाचा योग्य वापर किंवा नाही; या तीन प्रभांवर सरकारी अधिकाऱ्यांना न्यायालयासमोर याचे लागत असे. यास्य फक्त दहा सेनापतींचा अपवाद होता. पण पैशाच्या अफरातफरीच्या आरोपा वरून परिक्सिलाही एक वर्ष घरी बसावे लागले होते. वरील तरतुदीमुळे खरी लोकशादी म्हणा किंवा जनतेचे नियंत्रण नागरिक व अधिकारी यांच्यावर राहत असे.

**6) कायद्याविषयी आदर भाव :-**

नगरराज्यातील नागरिकांना कायद्याबद्दल आदर तर होताच; पण व्यक्ति स्वातंत्र्याबद्दलही कळकळ होती. राज्याची सर्व धोरणे, व्यवहार, न्यायदान, कारभार, युद्ध, तह वगैरे सर्व गोष्टी चर्चेनंतर ठरत. त्यामुळे जे ठरेल त्याची सर्वांनी मिळून काहर (अम्मलबजावणी करण्याकडे लोकांचा नैसर्गिक कल होता. कायदे लादले जातात तेव्हा ते मोडण्याकडे लोकांची प्रवृत्ती असते. नगरराज्यात ही शक्यता नव्हती. कारण कायदे, निर्णय, नियम सर्व स्वेच्छेने लोक स्वीकारीत. चर्चा करून निर्णय घ्यावयाचा व सर्वांनी मिळून तो अमलात आणावयाचा या पद्धतीमुळे एक उदात्त राजकीय तत्त्वज्ञान निर्माण झाले व त्याचा प्रभाव दोन हजार वर्षांनंतरही टिकून आहे. दण्डाला महत्त्व देणाऱ्या प्राचीन भारतीय राजनीतीपेक्षा ग्रीक नगरराज्यातील ही राज्यपद्धत कितीतरी वेगळी आहे. नगरराज्यात माणसाच्या बुद्धीवर विश्वास आहे. तो नवा विचार पटवून देऊ शकतो किंवा

पटवून घेऊ शकतो असे मानून त्यावर राज्ययंत्रणेची उभारणी आहे.

अथेन्सचे नागरिक स्वतंत्र राज्यातील स्वतंत्र नागरिक होते. सर्व ग्रीक विचार वन्तांचा झोटिंगशाहीवर (Tyranny ) पूर्ण अविश्वास आहे. कारण ती पद्धत नगर राज्यांतील मूळ स्वातंत्र्यालाच धक्का पोचवते.

7) **गुलामगिरी पनध्दती :-**

ग्रीक नगरराज्यांची वैशिष्टये सांगताना त्यांतील गौरवपूर्ण भाग वर सांगितला. नागरिक समान होते, त्यांना नागरी कर्तव्याची जाणीव होती, नगरराज्यांबद्दल अभिमान होता, तेथे लोकशाही होती, स्वातंत्र्य होते, कायद्याबद्दल आदर होता. हे सर्व सांगितले.

हे सर्व वाचताना नागरिकांच्यासाठी काबाडकष्ट करून अत्यंत अपमानित जनावराप्रमाणे जिणे जगणाऱ्या असंख्य गुलामांचा विसर पडू नये. गुलामांपैकी काही दुरून पकडून आणले होते, काही ग्रीसमधील मूळ रहिवासी होते, काही युद्धकैदी अस तीळ, काहींनी दारिद्यामुळे गुलामगिरी पत्करली असेल, अथेन्समधील ८० हजार ते एक लक्ष गुलामांना त्या नगरराज्यांतील लोकशाहीचा, स्वातंत्र्याचा, नागरी जाणीवेचा स्पर्शही होत नव्हता. घरात शेतीसाठी बैल, नांगर वगैरे साधने असावीत अशी गुलाम म्हणजे जिवन्त साधने होती. कोणालाही या अमानुष प्रथेबद्दल चीड नव्हती. गुलाम गिरीची प्रथा समाजाने गृहीत धरली होती.

8) **स्त्रीयांना नागरिकत्व नाही :-**

स्त्रियांनाही नागरिक समजले जात नव्हते. सर्व नगरराज्यांत अर्धी लोकसंख्या लोकशाहीपासून अस्पृश्य होती.

हेलनीज (ग्रीक) लोकांना स्वत:बद्दल इतकी श्रेष्ठत्वाची भावना होती की ते लीकेतर लोकांचा सरसकट उल्लेख जंगली म्हणून करीत. ॲरिस्टॅाटल म्हणतो की 'जंगली लोक स्वभावत:च गुलाम असतात.' नगरराज्य हाच एकमेव श्रेष्ठ प्रकार आहे व त्या प्रकाराला आम्ही हेलेनीज लोकच लायक आहोत असे ग्रीकांना वाटे. अशा उद्धटपणाच्या कल्पना सर्वच समाजात असतात की काय कोण जाणे!

**निष्कर्ष :-**

प्राचीन काळातील ग्रीक नगरराज्यातील ज्या नियमांच्या आधारे राज्य केले व त्यापैकी काही नियम आधुनिक काळात लागु आहेत. पण ग्रीक नगरराज्याची गुलामगीरी स्त्रीयांना नागरिकत्व न देणे हे तत्व विसंगत होते. पण आधुनिक काळात स्त्रीयांना नागरिकत्व देण्यात आले. व गुलाममगिरी नष्ट करण्यात आली. पण ग्रीक नगर राज्यांना काही मुलभुत नियमाची पायाभरणी केली हे विशेष.

**संदर्भ :-**

१) संतोष पाटील, राजकीय विचारप्रणाली, शुभम प्रकाशन,विठ्ठल नगर, लातूर
२) सुधाकर कुलकर्णी, निवडक राजकीय विचारवंत, विद्याभारती प्रकाशन, लातूर
३) भास्कर भोळे, आधुनिक भारतातील राजकीय विचार, पिंपळापूरे ॲण्ड पब्लिशर्स नागपूर
४) www.theroiesoforiginofstateinacientindia.